जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 NOV 2017
लोकमत

# विद्यापीठातर्फे 'संविधान दूत' अभिनव योजना

## महाजन : विद्यार्थी, शिक्षकांचा सहभाग

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** संविधान दिनानिमित्त (दि. २६ नोव्हेंबर) शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे 'संविधान दूत' ही अभिनव योजना राबविण्याचा निर्णय घेतला आहे, अशी माहिती केंद्राचे संचालक डॉ. एस. एस. महाजन यांनी शुक्रवारी येथे दिली.

डॉ. महाजन म्हणाले, भारतीय संविधानाबद्दल विद्यार्थी, शिक्षकांत जागृती निर्माण करणे, त्यांच्या माध्यमातून समाजालाही त्याविषयी अवगत करणे, मानवी हक्क व मानवी मूल्यांप्रती जागृती निर्माण करणे. त्यांच्या रुजवातीसाठी प्रयत्न करणे ही या प्रकल्पाची प्रमुख उद्दिष्टे आहेत. संविधानिक मूल्यांचा प्रचार व प्रसार करण्याचे महत्त्वाचे कार्य 'संविधान दूत' करतील शिवाय, डॉ. आंबेडकर केंद्रातर्फे राबविण्यात येणाऱ्या समाजोपयोगी उपक्रमांची माहिती समाजातील विविध घटकांपर्यंत पोहोचविण्यासाठी या केंद्राचे महाविद्यालयीन प्रतिनिधी म्हणून संविधान दूत कार्य करतील.

संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य महाविद्यालयातील किमान एका शिक्षकाची 'संविधान दूत' म्हणून निवड करतील. त्यांचे नाव डॉ. आंबेडकर केंद्राला कळवतील. या प्रकारे प्रत्येक महाविद्यालयात किमान एक संविधान दूत कार्यरत असेल. डॉ. आंबेडकर केंद्र आणि संलग्नित महाविद्यालये एकत्रितपणे निर्धारित उद्दिष्टांनुसार जागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करतील.



### महत्त्वपूर्ण उपक्रम

'संविधान दूत' हा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा आहे. त्या माध्यमातून भारतीय संविधानाविषयी विद्यापीठ परिक्षेत्रात जागृती करण्यात येणार आहे. या उपक्रमाला सर्व महाविद्यालये आणि नागरिकांनीही आवश्यक सहकार्य देऊन यशस्वीपणे राबविण्यास हातभार लावावा, असे आवाहन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

25 NOV 2017 लोकसत्ता जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ अधिसभेवर विकास आघाडीला यश

प्रतिनिधी, कोल्हापूर

**शिवाजी विद्यापीठाच्या** विविध अधिकार मंडळांच्या निवडणुकीत प्रथमच उतरलेल्या विकास आघाडी आणि शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघाने (सुटा) विजयाचे दावे केले आहेत.

शिवाजी विद्यापीठाची अधिसभा आणि अन्य अधिकार मंडळांसाठी शुक्रवारी मतदान झाले. ११ अभ्यास मंडळे (विभागप्रमुख) आणि संस्था प्रतिनिधी सहा, नोंदणीकृत पदवीधर एक, शिक्षक (अधिसभा) एक आणि प्राचार्य गटातील आठ जागा बिनविरोध झाल्या आहेत.या सर्व गटांतील उर्वरित एकूण ७२ जागांसाठी १५६ उमेदवारांमध्ये लढत रंगली आहे. शिवाजी विद्यापीठ विकास आघाडी, विद्यापीठ विकास मंच, विद्यापीठ शिक्षक संघ (सुटा), विद्यापीठ आजी-माजी विद्यार्थी कृती समितीसह काही अपक्ष उमेदवार या निवडणुकीच्या रिंगणात उतरले होते . त्यांनी नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यापासून विद्यापीठ आणि कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यांतील महाविद्यालयांमध्ये जोरदार प्रचार केला होता. .

विद्यापीठाच्या परीक्षा भवन येथे कासवगतीने मतमोजणी सुरु असल्याने निकालाचा ताण दोन्ही आघाडयांवर दिसत होता.

प्रथम विद्यापीठ शिक्षक गटाचा निकाल जाहीर झाला.'या गटात शिवाजी विद्यापीठ विकास मंच व शिवाजी विद्यापीठ पीजी टीचर्स असोसिएशनचे (सुप्टा) सचिव प्रा. डॉ. एन. बी. गायकवाड तब्बल १०० मते मिळवून विजयी झाले. प्राचार्य गटाच्या एका जागेसाठी झालेल्या निवडणुकीत शिवाजी विद्यापीठ विकास आघाडीचे डॉ. सी. टी. कारंडे ८९ मते मिळवून विजयी झाले. निवडणुकीत प्राचार्यांची पाच मते बाद झाली.

## विकास मंचची चमकदार कामगिरी


भारती विद्यापीठ, डी .वाय . पाटील विद्यापीठ यासारख्या प्रबळ शिक्षण संस्थांचा समावेश असलेल्या पाच संघटनांच्या एकत्रीकरणातून आकारास आलेल्या शिवाजी विद्यापीठ विकास मंचने चमकदार कामगिरी केली . पहिल्यांदाच निवडणूक लढवत त्यांनी मिळवलेले यश उल्लेखनीय ठरले . मंचचे सदस्य व शिवाजी विद्यापीठ पीजी टीचर्स असोसिएशनचे डॉ. एन. बी. गायकवाड तब्बल शंभर मते मिळवून विजयी झाले.

## 'सुटा'चे वर्चस्व कायम - प्रा . पाटील

या निवडणुकीत 'सुटा'ने धवल यश मिळवले असल्याचे संघटनेचे अध्यक्ष प्रा . आर . एच . पाटील यांनी सांगितले . अभ्यास मंडळात ४० पैकी २१ , अकादमी कौन्सिल मध्ये सर्व ६ आणि अधिसभा मध्ये १० पैकी ८ जागा मिळवून आमचे वर्चस्व सिद्ध केल्याचा दावा , प्रा . पाटील यांनी केला .

जनसंपर्क कक्ष
25 NOV 2017 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर





कोल्हापूर : आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी निवडण्यात आलेल्या विद्यापीठ संघासोबत मान्यवर.

# राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघ जाहीर

प्रतिनिधी
कोल्हापूर

दापोली येथे दि. २७ नोव्हेंबर ते १ डिसेंबर या कालावधीमध्ये संपन्न होणाऱ्या राज्यस्तरीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाचा १२० मुला/मुलींचा संघ सहभागी होणार आहे. शनिवार दि. २५ नोव्हेंबर रोजी हा संघ दापोलीस रवाना होईल. ॲथलेटिक्स, बॉस्केटबॉल, कबड्डी, खो–खो, व्हॉलीबॉल या क्रीडा प्रकारात विद्यापीठाचे संघ सहभागी होणार आहे.

या संघास विद्यापीठाच्यावतीने शुभेच्छा देण्याचा समारंभ गुरुवारी सायंकाळी येथील मेघनाथ नागेशकर क्रीडा संकुलामध्ये पार पडला. संघास शुभेच्छा देताना विद्यापीठाचे प्र–कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, आपल्या क्रीडा कौशल्याचे अचूक प्रदर्शन करीत या संधीचा योग्य उपयोग करुन सहभागी खेळाडूंनी विद्यापीठाचे नाव राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर उंचवण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी.

**दापोली येथे २७ पासून स्पर्धांना प्रारंभ**

यावेळी विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, क्रीडा विभागाचे प्रभारी संचालक डॉ. पी. टी. गायकवाड, प्रशिक्षक डॉ. के. बी. बेल्लद, डॉ. एस. जे. फराकटे, डॉ. एस. व्ही. बनसोडे, एस. एस. माळी, संजय एम. पाटील, डी. बी. बिरनोळे, शीला मोहिते, डॉ. एस. डी. पाटील, आर. एम. पाटील उपस्थित होते.